# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in
Email Id- divsec.kop@gmail.com


क्र.कोविमं/उमा/प्रात्य/ऑनलाइन/ 3715
कोल्हापूर ४१६००४
दिनांक- ०३/१२/२०२४

प्रति,

प्राचार्य,
माहिती तंत्रज्ञान विषय शिकवणारी सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२५ "माहिती तंत्रज्ञान" (I.T) विषयाची ऑनलाईन परीक्षेबाबत...**

**संदर्भ - १) राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./ऑनलाईन/आय.टी./जी.के./ ४६०८, दिनांक २९/११/२०२४.**

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२५ च्या "माहिती तंत्रज्ञान" (I.T) व विषयाची परीक्षा खालील वेळापत्रकाप्रमाणे होईल.**

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की "माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) या विषयाची परीक्षा दिनांक १२ मार्च २०२५, दि.१५ मार्च २०२५ व १७ मार्च २०२५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०१.३० आणि दुपारी ०३.०० ते ०५:३० याप्रमाणे सकाळच्या व दुपारच्या सत्रात प्रत्येकी २ तास ३० मिनिटे या कालावधीची राहील.

**या संदर्भात खालील सूचना देण्यात येत आहे.**

१) ऑनलाईन परीक्षा ही ज्या ठिकाणी "माहिती तंत्रज्ञान" (I.T) विषय शिकविण्यास मान्यता दिलेली आहे अशा सर्व कनिष्ठ महविद्यालयातच घेण्यात येईल. (माहिती तंत्रज्ञान विषय घेतलेल्या नियमित परीक्षार्थ्यांसाठी फक्त माहिती तंत्रज्ञान विषयासाठी त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय हेच परीक्षा केंद्र राहील.)

या विषयासाठी विद्यार्थी त्यांच्या लेखी परीक्षा केंद्रावर (प्रसंगानुरूप) न जाता त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयात जातील या बाबतच्या सूचना संबंधितांना देण्यात याव्यात.

२) सदर परीक्षेसाठी अखंडीत विद्युत पुरवठा, दूरध्वनी सेवा व इंटरनेट कनेक्टीव्हिटी आवश्यक आहे. या दृष्टीने आपण आपल्या कार्यक्षेत्रात विभागीय / जिल्हा स्तरावरील संबंधित यंत्रणांशी संपर्क साधून त्यांच्या अखंडीत उपलब्धतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. मंडळ स्तरावरून संबंधितांना तशी विनंती करण्यात आली आहे.

३) संगणक प्रयोगशाळा व संगणक यंत्रणा परीक्षेसाठी सुसज्ज करण्यात यावी. अखंडीत विद्युत पुरवठयासाठी जनरेटर, यू.पी.एस. किंवा तत्सम सामुग्रीची सोय करावी.

४) आय.टी.विषयाच्या परीक्षाचा कालावधी २.३० तासांचा आहे. यापूर्वी घेतलेल्या या विषयाच्या सर्व सराव परीक्षांचा अनुभव, प्रश्नपत्रिका आराखडयाचे स्वरूप पाहता सर्वसाधारणपणे १.४५ तास ते २ तास कालावधी प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी पुरेसा असल्याचे आढळून आले आहे. मात्र परीक्षेचे तांत्रिक स्वरूप पाहता संभाव्य तांत्रिक व्यत्ययाचा विचार करून परीक्षेचा कालावधी २.३० तास ठेवण्यात आलेला आहे. यामुळे विद्युत पुरवठा अर्ध्या तासापर्यंतच्या कालावधीसाठी खंडीत झाला असल्यास परीक्षेचे पुर्ननियोजन करण्याची आवश्यकता राहणार नाही. यापेक्षा जास्त कालावधीसाठी विद्युत पुरवठा खंडीत झाला असल्यास परीक्षेचे पुर्ननियोजन करण्यात येईल. याविषयीच्या सूचना सत्र परीक्षा झाल्यानंतर देण्यात येतील. पुनर्परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्याला पूर्वीच्या परीक्षेच्या वेळी सोडविलेली उत्तरे वाचण्याची व वाटल्यास त्यात सुधारणा/बदल करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

५) परीक्षा कालावधीत परीक्षा सुरू झाल्यानंतर इंटरनेट कनेक्टिव्हिटीमध्ये व्यत्यय आल्यास विद्यार्थ्यांनी गोंधळून न जाता प्रश्नपत्रिका सोडविण्याचे काम चालू ठेवावे. कनेक्टिव्हिटी उपलब्ध झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी दरम्यानच्या काळात सोडविलेली प्रश्नांची उत्तरे सबमिट करावीत. पेपरची वेळ संपावयाच्या वेळेत कनेक्टिव्हिटी खंडित झाली असेल तर पेपरची वेळ संपताच विद्यार्थ्यांनी दिलेली उत्तरे आपोआप सबमिट होतील. सबब अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी गोंधळून जाण्याचे कारण नाही असे संबंधितांना सूचित करावे.

६) दिव्यांग विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेप्रमाणे जादा वेळेची सवलत मान्य राहील व या विद्यार्थ्यांसाठी परीक्षेची वेळ माहिती तंत्रज्ञान या विषयासाठी ३ तास २० मिनिटे व सामान्यज्ञान या विषयासाठी २ तास ४० मिनिटे असतील. सदर माहिती विभागीय मंडळास कळविण्यात यावी.

७) गणकयंत्र विभागाकडून दिव्यांग विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त झालेली आहे. या व्यतिरिक्त ऐनवेळेस असे विद्यार्थी परीक्षेसाठी आल्यास त्यांचे बैठक क्रमांक आणि कनिष्ठ महाविद्यालयांचे क्रमांक त्वरित विभागीय तांत्रिक समन्वयकांना कळवावेत. जेणेकरुन त्यांच्या परीक्षेचे नियोजन करता येणे शक्य होईल अशा प्रकरणी त्यांच्याकडून आवश्यक ते प्रमाणपत्र प्राप्त करुन विभागीय मंडळास सादर करावे अशा सूचना संबंधितांना दयाव्यात.

या विषयासाठी नोंदविलेल्या विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक गणकयंत्र विभागामार्फत संगणक प्रयोगशाळेत उपलब्ध झालेले आहेत. याव्यतिरीक्त एखाद्या विद्यार्थ्याने नव्यानेच हा विषय घेतलाअसल्यास अथवा यापूर्वी हा विषय घेतला होता, परंतू ऐनवेळी तो वगळला असल्यास त्याची माहिती तसेच हा विषय घेतलेल्या एखाद्या विद्यार्थ्यास अपात्र ठरविले असल्यास (No Candidate) त्याची सविस्तर माहिती तात्काळ ईमेलव्दारे राज्य मंडळास **दि.०३/०३/२०२५** पर्यंत कळवावी.

**तांत्रिक व्यत्ययामुळे किंवा अन्य कारणामुळे परीक्षा देवू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत करावयाची कार्यवाही तसेच परीक्षेसाठी नियुक्त केलेल्या विभागीय मुख्य व सहाय्यक समन्वयक यांची माहिती.**

या परीक्षा कालावधीत जे विद्यार्थी तांत्रिक व्यत्यय वा अन्य कारणामुळे निर्धारीत वेळापत्रकानुसार परीक्षा देऊ शकणार नाहीत. त्यांच्यासाठी खासबाब म्हणून सर्व परीक्षा केंद्रावर **दिनांक १८ मार्च २०२५ रोजी सकाळी ११:०० ते ०१:३० व दुपारी ३:०० ते ०५:३० माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व दि. १९ मार्च २०२५ रोजी सकाळी ११:०० ते ०१:०० व दुपारी ०३:०० ते ०५:०० सामान्यज्ञान (जी.के.) या विषयांसाठी पुनर्परीक्षेची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.**

ज्या विद्यार्थ्यांची उपरोक्त कारणास्तव परीक्षा होणार नाही अशा कनिष्ठ महाविद्यालयांनी माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) विद्यार्थ्यांची माहिती दिनांक १७ मार्च २०२५ व सामान्यज्ञान (जी.के.) दिनांक १८ मार्च २०२५ रोजी या विषयांच्या ऑनलाईन परीक्षांच्या दुसऱ्या सत्रा पर्यंत विभागीय मंडळ कार्यालयातील विभागीय तांत्रिक सहाय्यक समन्वयकांना कळविणे आवश्यक आहे. सदर पुनर्परीक्षेसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारण्यात येऊ नये.

८) सर्वसाधारण परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना ज्या कारणासाठी गैरमार्गाचा अवलंब करण्याबद्दल शिक्षा बजावली जाते ती कारणे व शिक्षेची तरतूद 'ऑनलाईन' परीक्षेसाठी लागू राहील. लेखी परीक्षेप्रमाणेच विद्यार्थ्यांना कोणतेही अतिरिक्त साहित्य, तसेच मोबाईल, पेजर, कॅलक्युलेटर इत्यादी तत्सम इलेक्ट्रॉनिक साहित्य/वस्तू परीक्षेच्यावेळी जवळ बाळगता येणार नाही अशा स्पष्ट सूचना द्याव्यात.

९) जो विद्यार्थी नियोजित सत्रामध्ये परीक्षेस उपस्थित राहू शकणार नाही व पुढील सत्रासाठी उपस्थित रहाण्याबाबत इच्छा व्यक्त करेल त्या विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक, मूळ बॅच क्रमांक व तो कोणत्या सत्रामध्ये प्रविष्ठ होऊ इच्छित आहे याची माहिती ज्या परीक्षा सत्रात तो हजर रहाणार आहे ते परीक्षा सत्र सुरु होण्यापूर्वी किमान एक तास विभागीय तांत्रिक समन्वयक यांना संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाने कळविणे आवश्यक आहे. अन्यथा त्या विद्यार्थ्यांची परीक्षा त्या सत्रात होऊ शकणार नाही.

१०) तांत्रिक सहाय्यकाने परीक्षा कालावधीत केंद्रावर उपलब्ध असणे आवश्यक असले तरी त्यांने विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारे मदत करावयाची नसून प्रयोग शाळेत पर्यवेक्षकांनी बोलाविल्याशिवाय जावयाचे नसल्याबाबत त्यांना स्पष्ट सूचना देण्यात याव्यात.

११) मार्च २०२५ परीक्षेपासून गोपनीय साहित्य,तसेच गोपनीय सूचना ऑनलाईन स्वरुपात खालील दिलेल्या संकेतस्थळावर क.महाविद्यालयांच्या स्वतंत्र login वर उपलब्ध करुन देण्यात येतील.

**माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) - http://examinfo.mh-hsc.ac.in/**

**सामान्यज्ञान (जी.के.) - http://gk.mh-hsc.ac.in/**

१२) परीक्षा काळात येणाऱ्या समस्यांसाठी खालील राज्य समन्वयकांशी दूरध्वनी/मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

**१.सुषमा पाटील - ९८२३६६७८५५ २.समाधान ढाणे-७५८८०५९६५४**

१३) ऑनलाईन परिक्षेसाठी क.महाविद्यालयास ६० विद्यार्थी संख्येसाठी १५ संगणकाची आवश्यकता आहे तरी त्या प्रमाणात संगणकाची पुर्तता करुन घेण्याची सुचना करण्यात यावी.

सदर माहिती तंत्रज्ञान विषयाच्या 'ऑनलाईन' परीक्षा संचलनाबाबत परीक्षा केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व तांत्रिक सहाय्यक यांच्या नेमणूका व त्यांची पार पाडावयाची कामे याबाबतच्या मार्गदर्शक सूचना सोबत पाठवित आहे.संबंधित व्यक्तिंना द्यावयाच्या मानधनाचे दर खालीलप्रमाणे असून त्याप्रमाणे त्यांना मानधन देण्याची व्यवस्था करावी.

| | |
|---|---|
| **१) केंद्रसंचालक** | **एकवट मोबदला रु १६५ + प्रति सत्र रु ५०/- प्रमाणे** |
| **२) पर्यवेक्षक** | **प्रति सत्र रुपये ३०/- प्रमाणे** |
| **३) तांत्रिक सहाय्यक** | **प्रति सत्र रुपये ३०/- प्रमाणे** |
| **४) शिपाई** | **३०० विद्यार्थ्यांपर्यंत एक शिपाई एकवट मानधन रु.१००/-** |

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.